सं.फौ.प्र.क्र.६४०/२०२२
शासन वि. संतोष
नि.क्र. ११ खाली

CNR MHCH080010772022

**-न्या य नि र्ण य-**

(घोषित दिनांक १८/०३/२०२६)

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये खटला चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेल्या पुराव्याचा विचार करता, माझ्या मते खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदरील प्रत्येक मुद्दयाचा निष्कर्ष मी कारणासहीत अनुमान काढून नोंदवलेला आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दिनांक १०/०४/२०२२ रोजी २०.४५ ते २१.३० वाजेच्या दरम्यान मौजा खेड ता.ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर येथे आरोपी हा देशी दारूच्या प्रत्येकी ९० मीलीच्या ०५ बाटल्या विना परवाना ताब्यात बाळगून मिळून आला व त्या परिणामी त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला ? | ...नाही... |
| २ | अंतिम आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>– कारणमीमांसा–</u>**

३. आरोपीवरील दोष सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने पंच सा.क्र.१ देवानंद महादेव सोनकुसरे याला तपासले. दुसरा पंच साक्षीदार हा मरण पावला. त्यानंतर अभियोग पक्षाने त्यांचा पुरावा बंद केला. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये बयाण नोंदविण्यात आले.

४. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस. डी. हटकर व आरोपीतर्फे श्री. आर. सी. डांगे यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ व २ बाबतः–**

५. पंच सा.क्र.१ देवानंद सोनकुसरे यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दि.१०.०४.२०२२ रोजी पोलिसांनी त्यांना पंच म्हणून आरोपीच्या घरी मौजा खेडमक्ता येथे बोलविले होते. पोलिसांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या घरून त्याच्या ताब्यातून देशी दारूच्या ५ बॉटल जप्त केल्या. त्यापैकी एक बॉटल रासायनिक परिक्षणासाठी वेगळी करून सिलबंद केली. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, पोलिसांनी त्याच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पत्रक अनु. नि.क्र. २१ व २२ तयार केले. पोलिसांनी त्यांना पंचनाम्याला हजर राहण्यासाठी सूचनापत्र निशाणी २३ दिले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत दुसरा पंच यशवंत मोहूर्ले हा हजर होता. सदर साक्षीदाराने सरतपासात जप्त दारूचा बॅच नंबर व उत्पादन स्थिती सांगितली नाही. त्यांनी उलटतपासामध्ये मान्य केले की, ते खेडमक्ता या गावचे पोलिस पाटील आहेत. त्यांनी यापूर्वी देखील न्यायालयामध्ये पोलिसांचा पंच म्हणून साक्ष दिलेली आहे. पोलिसाकडे पंचनाम्याच्या वेळी कुठेलेही साहित्य नव्हते. वरील मान्य केलेल्या बाबीवरून निश्चितच पोलिसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पत्रक तयार केले किंवा नाही याबाबत संशय निर्माण होतो. तसेच सदरचा साक्षीदार हा पोलिसांचा नेहमीचा साक्षीदार आहे. त्यामुळे त्यांच्या एकटयाचा पुरावा आरोपीला दोषी धरण्याइतपत सबळ होणार नाही.

६. अभियोग पक्षाने या खटल्यातील फिर्यादी, तपासी अंमलदार व इतर संबंधीत साक्षीदारांचा पुरावा नोंदविलेला नाही. त्यामुळे पंच साक्षीदाराच्या पुराव्याला इतर कोणत्याही साक्षीदाराची पुष्टी नाही. खटल्यात रासायनीक प्रयोगशाळेचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. परंतु जप्त दारू आरोपीच्या ताब्यातून जप्त केली असा विश्वासार्ह कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे रासायनिक प्रयोगशाळेच्या अहवालाचा अभियोग पक्षाला फायदा होणार नाही. अभियोग पक्षाने नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यात

अवैध दारू दारू बाळगली ही बाब संशयापलीकडे जाऊन सिध्द केलेली नाही. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून व मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरात पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–आदेश–**

१. आरोपी संतोष उर्फ बिंडल भगवान सोनकुसरे याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) च्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. सदर खटल्यात जप्त मुद्देमाल तथाकथीत देशी दारू ही अपील कालावधीनंतर नष्ट करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर यांचे कडे पाठवावी.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ च्या पुर्ततेकरीता रू.१५,०००/– ची जामीन व बंधपत्र द्यावे.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.**

DNYANESHWAR BHAGWAT GUTTE
Digitally signed by DNYANESHWAR BHAGWAT GUTTE
Date: 2026.03.18 17:51:22 +0530

दिनांक – १८/०३/२०२६.
ठिकाण – ब्रम्हपुरी.

**(डी. बी. गुट्टे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
ब्रम्हपुरी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are word to word, as per original Judgment.

Name of Stenographer : N. B. Chavhan